**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/३०७/२०१०/३४

तक्रार दाखल दिनांक :- ०६/१०/२०१०
निकाल दिनांक :- २५/११/२०१०

श्री सुनिल गोरख भांदिर्गे,
आर.एक्स.६/६ आर. नं.१ अयोध्यानगर,
वाळुज एम.आय.डी.सी.
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९२१३०३०८३४१) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत ग्रामीण विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

कोरम प्रदीप. अ. सगणे अध्यक्ष/सदस्यसचिव

विलासचंद्र सु. काबरा सदस्य

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०६/१०/२०१० रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २०/१०/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापराकरीता वीज पुरवठा दिनांक ०१/०९/२००९ रोजी घेतला आहे. ग्राहकास माहे सप्टेबर २००८ मध्ये मागील मीटर वाचन १९७० व चालु वाचन २८५८ दाखवुन ८८८ युनिटचे ५३९८.६०/- रुपयाचे वीज देयक देण्यात आले. वरील वीज बिलामध्ये देण्यात आलेले चालु मीटर वाचण चुकीचे असल्याबाबत महावितरणच्या संबंधित कार्यालयात तक्रार दाखल केली. त्याचे तक्रारीनुसार कनिष्ठ अभियंता यांनी ग्राहकाचे स्थळ निरिक्षण करुन दिनांक १४/०८/२००९ रोजी मीटर वाचन २७९६ युनिट असल्याची नोंद केली आहे.व मीटर रिडीग नुसार बिल देण्याबाबत शिफारस केली आहे. परंतु संबंधित उपविभागाने ग्राहकाचे वीज बिल दुरुस्त न केल्यामुळे त्याने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष ग्रामीण मंडल औरंगाबाद येथे दिनांक १५/०३/२०१० रोजी तक्रार दाखल केली. वरील तक्रारची सुनावणी दिनांक ०५/०४/२०१० रोजी घेण्यात आली परंतु अंतर्गत कक्षाने ६ महीण्यापेक्षा ज्यास्त कालावधी झाल्यानंतरही आदेश पारीत न केल्यामुळे त्यांनी या मंचात तक्रार दाखल केली आहे.

२) वरील तक्रारीची सुनावणी २० व २६/१०/२०१० रोजी घेण्यात आली सुनावणीस नोडल अधिकारी प्रतिनिधी श्री कवाल सहाय्यक अभियंता ग्रामीण उपविभाग औरंगाबाद व वीज ग्राहक उपस्थित होते. ग्राहकाने आपली तक्रार वरील प्रमाणे कथन केली. नोडल अधिकारी यांनी ग्राहकास माहे ऑक्टोबर २००८ ते सप्टेबर २००९ या कालावधीमध्ये मीटर रिडींग न घेता वीज देयक देण्यात आल्याचे मान्य करुन वरील कालावधीकरीता कनिष्ठ अभियंता यांचे दिनांक १४/०८/२००९ चे स्थळ अहवालाप्रमाणे ८० युनिट प्रति महा आकारणी करुन ग्राहकास २६१२.८२ रुपयाची वजावट माहे फेब्रुवारी २०१० मध्ये देण्यात आल्याचे सांगीतले. नोडल अधिकारी यांनी वरील वीज बिल दुरुस्ती अहवालाची प्रत, ग्राहकाचे सी.पी.एल.तसेच कनिष्ठ अभियंता यांचे १४/०८/२००९ व ३०/१०/२०१० रोजी घेतलेल्या स्थळ निरिक्षण अहवालाच्या प्रति मंचात सादर केल्या. दोन्ही बाजुचे म्हणने ऐकुन घेतल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

३) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाचा माहे ऑगस्ट २००८ पर्यंत वीज बिलाबाबत कोणताही वाद नव्हता. कंपनीने दिलेली वीज देयके ग्राहकाने वेळोवेळी भरलेली आहेत. माहे सप्टेबर २००८ मध्ये ग्राहकाचे चालु मीटर वाचन चुकीचे दाखवुन ग्राहकास ८८८ युनिटचे रुपये ५३९८.६०/- चे वीज देयक देण्यात आले. त्यानंतर सप्टेबर २००९ पर्यंत ग्राहकास मीटर रिडींग न घेता सरासरी वीज आकारणी करुन वीज देयक देण्यात आल्याचे दिसुन येत आहे. नोडल अधिकारी यांनी सादर केलेल्या देयक दुरुस्ती अहवालाचे निरिक्षण केले असता त्यामध्ये ऑक्टोबर २००८ ते सप्टेबर २००९ या कालावधीत करण्यात आलेली सरासरी वीज आकारणी रद्द करुन त्याऐवजी स्थळ निरिक्षण अहवालाप्रमाणे ८० युनिट प्रति माह वीज आकारणी करुन २७१२.८२/- रुपयाचे क्रेडीट दाखविण्यात आल्याचे दिसुन येते.या वीज दुरुस्ती प्रस्तावामध्ये माहे सप्टेबर २००८ मध्ये घेण्यात आलेल्या चुकीच्या वीज आकारणीचे समायोजन करण्यात आलेले नाही. प्रत्येक्षात सी.पी.एल.नुसार असे दिसुन येते की, ग्राहकाचे माहे सप्टेबर २००८ मध्ये

चुकीचे व  अवास्तव रिडींग घेवुन त्याचे समायोजन करण्याकरीता माहे ऑक्टोबर २००८ ते ऑगस्ट २००९ या ११ महीण्याच्या कालावधीत एकसारखे रिडींग दाखवुन सरासरी पध्दतीने वीज आकारणी करण्यात आली. व सप्टेबर २००९ नंतर पुन्हा मीटर रिडींग नुसार वीज  देयक देण्यात आले. यावरुन असा निर्ष्कश निघतो की, ग्राहकाचे मीटर योग्य असुन माहे सप्टेबर २००८ मध्ये केवळ चुकीचे मीटर रिडींग घेतल्यामुळे ग्राहकाची तक्रार निर्माण झाली त्यामुळे वरील कालावधीत ग्राहकास सरासरीनुसार वीज आकारणी न करता प्रत्येक्षात  मीटर रिर्डीग  प्रमाणे वीज देयक दुरुस्त करुन सुधारीत वीज बिल देणे आवश्यक आहे. सी.पी.एल.नुसार ग्राहकाचे माहे ऑगस्ट २००८ चे मीटर वाचन १९७० युनिट असुन सप्टेबर २००९ अखेर २८८३ युनिट मीटर वाचन दाखविण्यात आले आहे. त्यामुळे (२८८३-१९७०)=९१३ युनिट वरील कालावधीत वीज वापर झालेला दिसुन येतो. त्यानुसार वीज देयक दुरुस्ती करणे योग्य होईल.

४) ग्राहकाने दिनाक १५/०३/२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष ग्रामीण मंडळ औरंगाबाद येथे तक्रार दाखल केल्यानंतर कक्षाने तक्रारीची सुनावणी करुन ६ महीण्यापर्यंत कोणतेही आदेश पारीत केले नाही. त्यामुळे ग्राहकास या मंचात तक्रार दाखल करावी लागली. महाराष्ट्र वीज नियामक आयोग विनियम २००६ चे कलम ६.३ नुसार कक्षाने वरील प्रकरणात आपली जबाबदारी पार पाडली नसल्याचे  सदर प्रकरणात दिसुन येत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने माहे सप्टेबर २००८ ते ऑगस्ट २००९ या कालावधीत केलेली वीज आकारणी रद्द करण्यात येत असुन वरील कालावधीकरीता ९१३ युनिट चे समप्रमाणात विभाजन करुन  वीज देयक देण्यात यावे.
२) वरील सुधारीत वीज बिल देतांना त्यात कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये.
३) वरील कालावधीत ग्राहकाने  भरणा केलेल्या रक्कमेची सुधारीत वीज बिलातुन वजावट करावी.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विलासचंद्र सु. काबरा**
**सदस्य**